# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि,गौतमनगर.

पो.कोळपेवाडी,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर.

**जा.क्र.ऊस विकास/ ५६४** **दिनांक -२९/०५/२०२४**

## -: परिपत्रक :-

## -: ऊस पिकावरील किड व रोगाचे एकात्मिक नियंत्रण :-

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते की, हुमणी या किडीचे भुगेंरे पहिल्या पावसाच्या सुरुवातीस लींबाचे व बोरीच्या झाडाजवळ पाने खातांना आढळतात.तसेच घराजवळ लाईटच्या प्रकाशात दिसुन येत आहे.त्यामुळे पुढे जाऊन पिकावर हुमणी किडीचा प्रादुर्भाव होवु शकतो.यामुळे ऊसाचे वजनात व साखर उताऱ्यात घट होऊन मोठया प्रमाणात नुकसान होवु शकते.सदर किड व रोगामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी खालीलप्रमाणे एकात्मिक नियंत्रण करणे गरजेचे आहे.

| अ.न | किड व रोगाचे नाव | लक्षणे | करावयाच्या उपाययोजना |
|---|---|---|---|
| १ | **हुमणी** | या किडीची अळी ऊस पिकाची मुळे कुरतडुन खाते त्यामुळे ऊस वाळुन नुकसान होते.अळीचा कालावधी २८१ दिवस इतका जास्त असल्यामुळे वेळीच नियंत्रण न केल्यास ऊस पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान होते. | **१) तांत्रिक उपाय-** प्लॉस्टिक घमेल्यात पाणी व डिझेल एकत्र मिसळुन त्यावर सायंकाळी ७ ते १० वेळेत इलेक्ट्रीक बल्प लावला असता रात्री हुमणी किडीचे भुंगेरे घमेल्यात जमा होऊन मरतात. हा उपाय जुन जुलै महिन्यात केल्यास प्रौढ अवस्थेतील भुंगेरे मरतात.<br>२) ऊसाच्या सरीमध्ये **क्लोरोपायरीफॉस ५०%**प्रती एकरी १ लिटर ४०० लि. पाण्यातुन आळवणी करावी<br>**किंवा**<br>**३)** लिसेंटा २०० ग्रॅम किटकनाशक प्रती एकरी ४०० लिटर पाण्यामध्ये मिसळुन आळवणी करावी<br>**किंवा**<br>४) **फिप्रोनील ०.३%(रिजेंट)** दाणेदार प्रती एकरी १० किलो घेवुन ऊसाचे मुळाजवळ रासायनिक खतात मिसळुन टाकणे.<br>**किंवा**<br>**५) व्ही.एस.आय. निर्मित** द्रवरुप जैविक किटकनाशक **(B.V.M)** प्रती एकरी २ लिटर घेवुन ४०० लिटर पाण्यातुन आळवणी अथवा ठिबक मधुन दयावे.<br>**६) व्ही.एस.आय.निर्मित ई.पी.एन् (सुत्रकृमी)** १ लीटर ४०० लीटर पाण्यात मिसळुन पिकाच्या मुळाशी आळवणी किंवा ठिंबक सिंचनातुन सोडावे. . |
| २ | **पांढरी माशी** | पांढ्या माशीची बाल्यावस्था पानाच्या मागील बाजुने रस शोषण करते. त्यामुळे पाने निस्तेज होतात व पिवळी पडुन वाळतात.परिणामी ऊसाचे वजनात व साखर उताऱ्यात कमालीची घट आढळुन येते.<br>पांढ्या माशीने ग्रस्त ऊसाचे पानांवर काळया रंगाची बुरशी (कॅपनोडीयम) आढळते ज्यामुळे पानांची अन्न तयार करण्याची क्रिया मंदावते पाने वाळतात | **प्रती एकरी फवारणीकरीता**<br>**१) पाणी + युरिया + ॲसीफेट + नुवॉन**<br>**२०० लि. ४ किलो २५० ग्रॅम ४००मिली.**<br>**किंवा**<br>**२) पाणी + युरिया + इमीडॅक्लोप्रीड १७.८%**<br>**२०० लि. ४ किलो १००मिली**<br>**किंवा**<br>**३)** व्ही.एस.आय निर्मित द्रवरुप जैविक किटकनाशक **मेटाराइजियम ॲनिसोपली व व्हर्टिसेलियम लेकानी (B.V.M)** ची एकरी २ लि**.** प्रती एकर ४०० लि.पाण्यातुन फवारणी करावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **पांढरा लोकरी मावा** | १.पांढरा लोकरी मावा ऊसाच्या पानाच्या पाठीमागील बाजुस बसलेला असतो<br>२.पानातील गोड रस शोषुन घेतो.बाहेर फेकलेला गोड पदार्थ खालच्या पानावर वरील बाजुस पडतो व त्यावर काळया रंगाची बुरशी वाढते त्यामुळे संपुर्ण पान काळे पडते.परिणामी अन्न तयार करण्याची क्रिया मंदावते व पाने कोरडी पडुन वाळतात.ऊस कमकुवत होतो आणि वाढ खुंटते उत्पन्न व साखर उताऱ्यात घट येते. | **प्रति एकरी फवारणी करीता**<br>**१) पाणी + बी.व्ही.एम (v.s.i निर्मित)**<br>**२०० लि २ लि.**<br>**किंवा**<br>**२) पाणी + डायमेथोएट ३० % (रोगर)**<br>**२०० लि. ४०० मिली )**<br>**किंवा**<br>**३) पाणी + ॲसीफेट ७५%**<br>**२०० लि. २५० ग्रॅम**<br>**किंवा**<br>**मॅलेथिऑन ४% भुकटी १५ किलो प्रती एकरी ऊसपिकावर धुरळावी.** |
| ४ | **पायरीला किड** | ऊसाच्या पानावर लहान व मोठे पायरीला (पाकोळी) बसलेले दिसतात. बाल्या व प्रौढ अवस्थेत पायरीला पानाच्या खालच्या भागातुन रस शोषतात. परिणामी ऊसाची पाने पिवळी व कोरडी पडतात. तसेच काही पाने शेंड्यापासुन वाळण्यास सुरुवात होते. पायरीलाची पिल्ले पांढऱ्या रंगाची असुन त्याला करंगळयासारख्या दोन शेपट्या असतात. मोठे पायरीला तपकिरी दिसतात. | **प्रति एकरी फवारणी करीता**<br>**१) इपिरीकॅनिया या परोपजीवी किटकांचे कोष ४०० व अंडी ४०,००० हजार अंडी प्रति एकरी सोडावीत.**<br>**२) पायरीलाची अंडी पानावरुन गोळाकरुन नष्ट करावी.**<br>**३) परोपजीवी किटक असलेल्या शेतात किटकनाशकांची फवारणी करु नये.**<br>**४) परोपजीवी किटक नसल्यास फवारणी करीता**<br>**पाणी + इमिडॅक्लोप्रिड १७.८% + युरिया**<br>**२०० लि + १०० मिली + ४ किलो** |
| ५ | **ऊस पिकाच्या पानावरील तपकिरी ठिपके (ब्राउन स्पॉट)** | हा बुरशीजन्य रोग असुन तो **(सरकोस्पोरा लाँगीपस)** या बुरशीमुळे होतो.रोग करणाऱ्या बुरशीची लागण सर्वप्रथम जुन्या पानावर होते.त्यामुळे ऊसाच्या पानावर लाल तपकिरी रंगाचे अंडाकृती ठिपके दिसुन येतात.रोगाची तीव्रता वाढल्यावर ऊसाच्या पानांचा पुर्ण भाग व्यापला जातो.त्यानंतर पाने करपतात वाळतात दुरुन रोगग्रस्त पिक तांबेरा रोगाने ग्रासल्यासारखे दिसते.पर्यायाने पानांची अन्न तयार करण्याची क्रिया मंदावते व उत्पन्नात घट येते.पावसाळयात जास्त काळ पाणी साचलेल्या जमिनीत तसेच भारी जमिनीत ऊस पिकास या रोगाची तिव्रता जास्त असते. | **प्रति एकरी फवारणी करीता**<br>**१) पाणी + कॉपर ऑक्झीक्लोराईड + स्टिकर**<br>**२००लि. ५००ग्रॅम १०० मि.ली**<br>**किंवा**<br>**२) पाणी + मॅकोझेब + स्टिकर**<br>**२००लि. ५००ग्रॅम १००मि.ली**<br>**( फवारणीचा कालावधी-२ ते ३ फवारण्या १५ दिवसाच्या अंतराने करणे )** |

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादकांनी उपरोक्त सर्व पध्दतीचा समन्वय साधुन किड व रोगाचे नियंत्रण करावे तसेच अधिक माहितीसाठी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयात संपर्क साधावा

**आपला विश्वासु,**

**एस.एस.कोल्हे**

**प्रभारी कार्यकारी संचालक**

## **कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर**
## **पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव , जि.अहमदनगर**

**जा.क्र./ ऊस विकास / ५९७** **दिनांक -३१/०५/२०२४**

## **-- परिपत्रक --**

### **- ताग / धैंचा बियाणेंचा २५% अनुदानावर पुरवठा -**

कारखाना कार्यक्षेत्रातील 'अ' वर्ग व 'क' वर्ग ऊस उत्पादक सभासदांना कळविण्यात येते की, एकाच क्षेत्रात वारंवार ऊस पिक घेतल्यामुळे तसेच पाण्याच्या व रासायनिक खतांच्या अतिवापराने जमिनीची सुपिकता कमी झालेली आहे. त्यामुळे ऊसाची उत्पादकता घटत आहे.

जमिनीची सुपिकता सुधारण्यासाठी ऊस पिकाचे लागवडीपुर्वी त्या क्षेत्रात ताग किंवा धैंचा सारखी हिरवळीचे खत पिकाची पेरणी करुन जमिनीत गाडावीत त्यामुळे जमिनीचे भौतिक रासायनिक व जैविक गुणधर्म सुधारतात. सेंद्रीय पदार्थांची उपलब्धता वाढते. क्षारांचे प्रमाण कमी होऊन जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीत नत्राची उपलब्धता वाढते. जमीन रवाळ होण्यास मदत होते व जमिनीचा कसदारपणा वाढतो. या कारणाने चालू खरीप हंगाम २०२४ मध्ये ताग व धैंचा बियाणे खालील धोरणाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय मा.संचालक मंडळाने घेतलेला आहे.

**१.** लागवड हंगाम २०२४-२५ मध्ये होणा-या ऊस लागवडीकरीता २५ % अनुदानावर एकरी ४० किलो ताग किंवा एकरी २० किलो धैंचा बियाणे हिरवळीच्या खता करीता, बियाणे उपलब्ध असेपर्यंत देण्यात येईल.

**२.** ताग व धैंचा बियाणांची मागणी बियाणे विक्री करतेवेळी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयात छापील फॉर्ममध्ये नोंदवावी.

**३. मागील ३ वर्षात गाळपास आलेला ऊस व गळीत हंगाम २०२४-२५ करीता केलेली ऊसाची नोंद विचारात घेवुन तसेच थकबाकी नसलेल्या ऊस उत्पादकास बियाणे पुरविण्यात येईल.**

**४.** ताग व धैंचा बियाणाच्या एकुण बिलाच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम ऊस उत्पादकाकडुन बिल करतेवेळी रोख भरणा घेण्यात येईल.कारखान्यामार्फत २५% अनुदान देण्यात येईल व उर्वरीत २५% रक्कम नावे टाकुन गळीतास येणाऱ्या ऊस बिलातुन १२.५% व्याजदराने वसुल करण्यात येईल.

**५. ताग / धैंच्याचे पिक जमिनीत गाडलेनंतर त्या शेतात ऊसाची लागवड करावी. सदरच्या क्षेत्रात ऊस लागवड न केल्यास किंवा बियाणांची अन्य विल्हेवाट लावल्यास अथवा गळीत हंगाम २०२४-२५ करिता नोंदविलेला ऊस कुठल्याही कारणास्तव गळीतास न आल्यास दिलेल्या अनुदानासह संपूर्ण रक्कम सव्याज सभासदाच्या किंवा एकत्रित कुटुंबातील देय पेमेटमधुन वसूल केली जाईल.**

**६.** हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या जमिनीत ताग घ्यावा व क्षारयुक्त आणि भारी जमिनीत धैंचा हे पिक घ्यावे.

**७.** कुटुंबातील इतर व्यक्तीचे नावावर बियाणे घेण्यासाठी संबंधीत व्यक्तीचे संमतीपत्र, घेणाऱ्यांचे आधार कार्ड बंधनकारक राहील.

तरी सर्व ऊस उत्पादकांनी वरील योजनेचा लाभ घेऊन जमिनीची सुपीकता वाढवून ऊस उत्पादन वाढविण्याचे करावे.

**कळावे,**

**आपला विश्वासु,**
**सुनिल एस.कोल्हे**
**प्रभारी कार्यकारी संचालक**